**ठळक बातम्या**

- छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार वैश्विक आहे, त्यांना महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवू नका असं केंद्रीय गृहमंत्र्यांचं आवाहन

- अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचं स्मारक उभारण्यासाठी राज्यशासन वचनबद्ध असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- नागपूर जिल्ह्यात उमरेडमध्ये कारखान्यात झालेल्या स्फोटात ५ जणांचा मृत्यू, ६ जण जखमी

**आणि**

- कोल्हापूरचा ज्योतिबा तसंच सप्तश्रृंगी गडावर यात्रेनिमित्त भाविकांची गर्दी

**<><><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार वैश्विक आहे त्यांना महाराष्ट्रापुरता मर्यादित ठेवू नका असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. रायगड पर्यटन नव्हे तर प्रेरणास्थळ बनवण्यासाठी आपलं सरकार कटीबद्ध आहे, असं त्यांनी सांगितलं. शालेय विद्यार्थ्यांनी या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली पाहिजे यासाठी उपाययोजना करण्याची सूचना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली.

**... होल्ड - बाईट- अमित शहा**

अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचं स्मारक उभारण्याचा प्रकल्प न्यायप्रविष्ट असल्याने थांबला आहे, तो पूर्ण करण्यासाठी राज्य शासन कसोशीने प्रयत्न करेल असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिलं. दिल्लीतही छत्रपतींचं स्मारक उभारावं अशी मागणी त्यांनी केली. भाजपाचे खासदार आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज छत्रपती उदयन राजे भोसले यांचंही यावेळी भाषण झालं. छत्रपती शिवरायांशी संबंधित पर्यटन स्थळांचं सर्किट विकसित करावं अशी मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमापूर्वी अमित शहा यांनी पाचाड इथं जाऊन राजमाता जिजाऊ भोसले यांच्या समाधीला वंदन केलं. छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि मराठ्यांचा इतिहास तसंच संस्कृती यांच्यासाठी भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींचा या कार्यक्रमात रायगड स्मारक मंडळातर्फे सत्कार करण्यात आला.

**<><><><><>**

चित्रलेखा साप्ताहिकाने आपल्या पत्रकारितेतून देशातल्या समस्यांवर प्रकाश टाकला असून देशाच्या विकासात महत्वाची भूमिका निभावली आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी  केलं. चित्रलेखा या गुजराती साप्ताहिकाच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. चित्रलेखानं समाजाला एकत्र आणण्याचं काम केलं असंही शहा म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चित्रलेखाच्या वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. आणि चित्रलेखा मराठी साप्ताहिक पुन्हा सुरू करावं, अशी विनंती केली.

**<><><><><>**

राज्य परिवहन महामंडळाचं उत्पन्न वाढावं याकरता विविध उपाययोजनांवर सरकार विचार करत असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. ते पुण्यात वार्ताहरांशी बोलत होते. सर्वसामान्य नागरिकांना किफायतशीर दरात प्रवास करता यावा त्यासाठी राज्य शासनाकडून एसटी महामंडळाला वारंवार मदत केली जाते. करोना काळात प्रवासी वाहतूक पूर्णपणे ठप्प असताना देखील राज्य शासनाने एसटी महामंडळाला अडीचशे ते तीनशे कोटी रुपये दिले. मोफत प्रवासाच्या विविध सवलतींच्या पोटी राज्य शासनाकडून एसटी महामंडळाला निधी दिला जातो. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते, असंही पवार यांनी सांगितलं. एसटी महामंडळाच्या जागा बांधा, वापरा, हस्तांतरित करा या तत्त्वावर देण्याचा विचार सुरू आहे. त्यातून एसटी महामंडळाला मोठं उत्पन्न मिळू शकेल, असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला.

<><><><><>

नागपूर जिल्ह्यात उमरेडमध्ये एका कारखान्यात झालेल्या स्फोटात ५ जणांचा मृत्यू झाला असून ६ जण जखमी झाले आहेत. मृतांच्या नातेवाईकांना कंपनी ५५ लाख रुपये देणार असून राज्य सरकार ५ लाख रुपये देईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. जखमीच्या नातेवाईकांना कंपनी रोजगार देणार आहे. जखमींना कंपनी ३० लाख रुपये देणार असून जखमींवर राज्य सरकार उपचार करणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. यापुढे अशा घटना घडू नये यासाठी सर्व कंपन्यांचे फायर ऑडिट होईल, अशी माहिती उमरेडचे आमदार संजय मेश्राम यांनी यावेळी दिली.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यात खडवली इथं अनधिकृत रित्या चालवल्या जाणाऱ्या बालकांच्या निवासी संस्थेवर जिल्हा प्रशासनानं आज तातडीची कारवाई करत २९ बालकांची सुटका केली. पसायदान विकास संस्था या नावानं चालवल्या जाणाऱ्या या संस्थेत बालकांना जबर मारहाण तसंच अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार होत असल्याची तक्रार चाईल्ड हेल्प लाईनवर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली. या प्रकरणी संस्थेचे संचालक, त्यांच्या पत्नी, मुलगा आणि इतर दोघे अशा एकूण पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

<><><><><>

रायगड जिल्ह्यातल्या अलिबाग समुद्राजवळ अजंठा कंपनीच्या प्रवासी बोटीच्या बिघाडाची सखोल चौकशी करण्याचे आदेश मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी दिले आहेत. महाराष्ट्र सागरी मंडळाने यासाठी त्रिसदस्य चौकशी समिती स्थापन केली आहे. तीन दिवसात ही समिती राज्य सरकारला अहवाल सादर करणार आहे. अजंठा कंपनीच्या बोटीची सर्व प्रमाणपत्र निलंबित करत पुढील आदेशापर्यंत त्यांना प्रवासी वाहतुकीला मनाई केली आहे. गेटवे ऑफ इंडिया इथून मांडवा येथे १३० प्रवाशांना घेऊन निघालेल्या या बोटीत मांडवा जेट्टीजवळ समुद्राचं पाणी शिरलं होतं.

<><><><><>

पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे गर्भवतीचा मृत्यू झाल्याप्रकरणी रुग्णालयाचे प्रसूतीतज्ज्ञ डॉ. सुश्रुत घैसास यांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलनं नोटीस बजावली आहे.संबंधित उपचारात डॉ. घैसास यांचा सहभाग असल्यानं त्यांची सुनावणी येत्या मंगळवारी होणार असल्याचं एमएमसी सूत्रांनी सांगितलं.

<><><><><><>

कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासह राज्यातल्या सर्व नागरीकांना आरोग्यसंपन्न, सुखी आणि आनंदी राहू दे अशी प्रार्थना दख्खनचा राजा श्री जोतिबाकडे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज केली. चैत्र पौर्णिमा जोतिबा यात्रेनिमित्त मानाच्या सासनकाठींचे पूजन आज त्यांच्या हस्ते झालं. महाराष्ट्र, कर्नाटकसह देशभरातील भाविकांचं श्रद्धास्थान असलेल्या श्री जोतिबा देवाची चैत्र यात्रा सासनकाठी मिरवणूक उत्साहात पार पडली. यावर्षी प्लास्टिकमुक्त यात्रा पार पाडण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीतर्फे २५ हजारावर कापडी पिशव्यांचं वाटप करण्यात आलं. यावेळी गर्दीच्या ठिकाणी सनियंत्रणासाठी विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

<><><><><><>

नाशिक मधल्या आद्यस्वयंभू शक्तीपीठ मानल्या जाणाऱ्या सप्तश्रृंग गडावर रामनवमी ते चैत्र पौर्णिमे दरम्यान देवीचा चैत्रोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला असून काल मध्यरात्री किर्तीध्वज फडकला. या सात दिवसांच्या कालावधीत ८ ते १० लाख भाविकांनी देवीचं दर्शन घेतलं. आज संध्याकाळ पर्यंत देवीच्या दर्शनासाठी इथं बाऱ्या लागल्या होत्या.

<><><><><>

खान्देश कुलस्वामिनी एकवीरा देवीची आज चैत्र पोर्णिमेनिमित्त धुळे शहरातून रथ यात्रा काढण्यात आली. यात्रेपूर्वी एकवीरा देवीचं आणि रथाचं पूजन करण्यात आलं.भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

<><><><><>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त राज्य शासनाच्या पर्यटन विभागाच्या पर्यटन संचालनालयानं येत्या १४ आणि १५ एप्रिलला मुंबई, नाशिक आणि नागपूर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट सहलीचं आयोजन केलं आहे. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. या टूर सर्कीटमध्ये मुंबईतल्या दादरमधील चैत्यभूमी, राजगृह, प्रिटींग प्रेस, परळ मधील बि.आय.टी चाळ, वडाळा इथलं डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, फोर्ट मधील सिद्धार्थ महाविद्यालय या स्थळांचा समावेश आहे. नाशिकमधील येवले मुक्तीभूमी, त्रिरश्मी लेणी आणि काळाराम मंदिर या स्थळांचा तर नागपूरच्या दिक्षाभूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय, कामठी इथल्या ड्रॅगन पॅलेस आणि नागलोक विहार या स्थळांचा यात समावेश आहे.

<><><><><>

तांत्रिक बिघाडामुळे देशभरात आज युपीआयच्या सेवा विस्कळीत झाल्यानं कोट्यावधी ग्राहकांची गैरसोय होत आहे. यामुळं अनेक बँकांच्या ॲपच्या कामावर परिणाम झाला आहे. ही तांत्रिक अडचण दूर करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं कळवलं

आहे. दररोज सरासरी ५९ कोटी व्यवहार युपीआय द्वारे होतात आणि त्यातून ८० हजार कोटी रुपयांची देवाणघेवाण होते.

**<><><><><><>**

उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, दक्षिण महाराष्ट्र आणि कोकणाच्या काही भागात आज तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत किंग्स इलेव्हन पंजाबनं सनराइजर्स हैदराबाद विरोधातल्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे.

//<><><><><><>//